**अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन**

**ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर**

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २५.०४.२०२५

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१९.०४.२०२५ ते २५.०४.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२६.०४.२०२५ ते ३०.०४.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | १३.८ | १.० | ८.० | पाऊस (मिमी) | १२ | १३ | ६ | २ | ० |
| ३८.० | ३७.२ | ३७.४ | ३६.५ | ४०.० | ३८.२ | ३५.५ | कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३४ | ३५ | ३५ | ३६ |
| २३.५ | २२.६ | २३.४ | २४.२ | २१.२ | २२.६ | २२.७ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २३ | २२ | २२ |
| ४ | ४ | ५ | ० | ० | ० | ८ | स. ढग स्थिती (आकाश) | ४ | ५ | ३ | ३ | १ |
| २ | ६ | २ | ५ | ० | ० | - | दु. | | | | | |
| ८६ | ८५ | ७५ | ८१ | ७८ | ८९ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९४ | ९३ | ९२ | ९४ | ९५ |
| ३६ | ३४ | ४० | ४० | ३८ | ३८ | ५४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५३ | ५५ | ५३ | ५२ | ५३ |
| २.८ | ३.० | २.६ | ३.२ | २.८ | ३.७ | २.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ३ | ४ | ५ | ७ |
| नै. | प.नै. | पू.ई. | द.आ. | वा. | प. | प. | स. वाऱ्याची दिशा | प.वा. | उ. | प. | प. | प. |
| प.वा. | ई. | ई. | पू.ई. | प.नै. | प.नै. | - | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२५ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२५पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| २२.८ | २९.४ | ५ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची, दिनांक २८ व २९ एप्रिल रोजी अंशत: ढगाळ राहण्याची तर दिनांक ३० एप्रिल रोजी आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २६, २७, २८ व २९ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवसांत कमाल तापमान ३४.० ते ३६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९२ ते ९५% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ५२ ते ५५% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ३ ते ७ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ३० एप्रिल ते ६ मे, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी तर किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| हवामान ईशारा | | **कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २५ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना विजांचा कडकडाट व ताशी ५० ते ६० इतक्या वेगाच्या वाऱ्यासह गारा पडण्याची शक्यता आहे.**<br>कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २६ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना विजांचा कडकडाट ताशी ३० ते ४० इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २७ एप्रिल रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना विजांचा कडकडाट ताशी ३० ते ४० इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ जिल्ह्यामध्ये **२५, २६ व २७ एप्रिल रोजी** तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या पिकाची (सूर्यफूल, ज्वारी व कांदा) काढणी करावी व मळणी करून तयार झालेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.<br>➢ दिनांक **२५, २६ व २७ एप्रिल रोजी** मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बंधूंनी स्वत:ची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी.<br>➢ दिनांक २५ एप्रिल रोजी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी गारा पडण्याची शक्यता असल्याने आंबा, केळी, कलिंगड आणि टोमॅटो या पिकांमध्ये फळांच्या संरक्षणासाठी हेलनेटचा वापर करावा<br>❖ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना, विजांचा कडकडाट व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/बांबू च्या सहय्याने आधार द्यावा.<br>➢ शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टिकच्या शीटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. |
| संदेश | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" तर विजांच्या अंदाजासाठी "दामिनी" हे अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करून वापरावे. |
| सुर्यफुल | पक्वता | ➢ पक्व झालेल्या सुर्यफुल पिकाची त्वरित काढणी करावी व पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| भुईमुग | वाढीची | ➢ भुईमुग पिकातील सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी ०.५% लोह व ०.२ % झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ५० व ७०दिवसांनी पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ सुरु ऊस लागवडीस मोठ्या बांधणीच्या वेळी रासायनिक खतांची मात्रा नत्र १०० किलो (युरिया २१७ किलो), स्फुरद ५५ किलो (सिंगल सुपर फॉस्फेट ३४४ किलो) व पालाश ५५ किलो(म्युरेट ऑफ पोटॅश ९२ किलो) प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावी.<br>➢ पावसाची उघडीप पाहून २८ एप्रिल नंतर खतांचा हप्ता द्यावा. |
| आंबा | फळ पक्वता | ➢ आंबा पिकामध्ये तयार झालेली फळे नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेली फळे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत.<br>➢ उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी आणि फळांमध्ये साका तयार होण्याचे टाळण्यासाठी काढलेली फळे सावलीत ठेवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये.<br>➢ गारा पडण्याची शक्यता असल्याने आंबा फळांचे गारांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी आंबा बागेमध्ये हेलनेटचा वापर करावा |
| टोमॅटो | वाढीची | ➢ दिनांक २५, २६ व २७ एप्रिल रोजी मेघर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या पावसाची शक्यता असल्याने टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो रोपांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा.<br>➢ गारा पडण्याची शक्यता असल्याने टोमॅटो फळांचे गारांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी टोमॅटो बागेमध्ये हेलनेटचा वापर करावा |
| केळी | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या/ काढणीस आलेल्या घडांची काढणी करावी व काढणी केलेले घड सुरक्षित ठिकाणी ठेवावेत<br>➢ पाऊस व जोरदार वाऱ्याने केळी झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून फळझाडांना बांबू/काठीच्या सहाय्याने आधार द्यावा.<br>➢ गारा पडण्याची शक्यता असल्याने केळी घडांचे तसेच केळी पिकाचे गारांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी केळी बागेमध्ये हेलनेटचा वापर करावा |
| कांदा | पक्वता | ➢ पक्व झालेल्या कांदा पिकाची त्वरित काढणी करून घ्यावी व तयार शेतीमाल सुरक्षित ठिकणी ठेवावा .<br>➢ कांदा पिकाची काढणी केली असल्यास व त्वरित सुरक्षित ठिकाणी नेणे शक्य नसल्यास शेतामध्ये गोळा केलेले कांदे पॉलीथिन शीटने झाकावेत. |
| कलिंगड | वाढीची | ➢ गारा पडण्याची शक्यता असल्याने कलिंगड फळांचे गारांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी कलिंगड पिकामध्ये हेलनेटचा वापर करावा |
| पशुधन | वाढीची | ➢ ईशारा कालावधीदरम्यान जनावरे शक्यतो बाहेर चारावयास नेऊ नयेत.<br>➢ मेघगर्जना ,विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २५.०४.२०२५

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा